# महाराष्ट्र शासन

# इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपुर

सेंट्रल एव्हेन्यु रोड,रेल्वे स्टेशन जवळ,नागपुर -४४००१८

**कार्यालय दुरध्वनी क्रमांक** ०७१२-२८२०२०० **फॅक्स क्रमांक** ०७१२-२७८०२८

**ई मेल आय डी क्रमांक** -: igmcn@rediffmail.com **वेबसाईट** -: igmc.org

जा.व.क्रमांक,इंगांशावैम/आस्था १व२/जाहिरात/ 6373 /२०२४ दिनांक 3 / १०/२०२४

**-: जाहिरातीची सुचना :-**

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांच्या अधिपत्याखालील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर या आस्थपनेवरील सहायक प्राध्यापक व इतर वर्ग-ब यांचे रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसासाठी उमेदवारांकडून भरण्यास पृथक अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जाचे कोरे नमुने दिनांक ०४.१०.२०२४ ते दिनांक १५.१०.२०२४ पर्यंत वेळ १०.३० ते ५.०० पर्यंत अधिष्ठाता कार्यालय,आस्थापना विभाग वर्ग ०२ येथे उपलब्ध आहे. ऑफलाईन अर्ज दिनांक १५.१०.२०२४ रोजी ०२.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. सदर पदासाठी मुलाखती १८.१०.२०२४ रोजी ठिक ०३.०० वाजता अधिष्ठाता,कार्यालय यांचे दालनात ठेवण्यात आली आहे. अधिक माहितीकरीता सदर जाहिरात महाविद्यालयाच्या igmc.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सहायक प्राध्यापक संवर्ग रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | खुला | एसईबीसी | ईडब्लूएस | विमाप्र | इमाव | विजाअ | भजब | भजक | भजड | अ.ज | अ.जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | औषधवैद्यकशास्त्र | ०५ | ३ | - | - | - | १ | - | - | - | - | - | १ |
| ०२ | स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ०३ | शल्यचिकित्साशास्त्र | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | - |
| ०४ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०२ | - | - | - | - | २ | - | - | - | - | - | - |
| ०५ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | ०१ | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ०६ | क्ष-किरणशास्त्र | ०२ | १ | १ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ०७ | कान नाक व घसाशास्त्र | ०१ | - | - | - | - | १ | - | - | - | - | - | - |
| ०८ | बधिरीकरणशास्त्र | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ०९ | दंतशास्त्र | ०१ | - | - | - | - | १ | - | - | - | - | - | - |
| १० | माता बालसगोपन अधि-नि-अधिव्याख्याता (OBGY) | ०१ | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ११ | प्रसुतीपुर्व अधि-नि-अधिव्याख्याता (OBGY) | ०१ | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १२ | शरीररचनाशास्त्र | ०१ | - | - | १ | - | - | - | - | - | - | - | - |
| १३ | शरीरक्रियाशास्त्र | ०३ | २ | - | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| १४ | जीवरसायनशास्त्र | ०२ | - | १ | १ | - | - | - | - | - | - | - | - |
| १५ | औषधशास्त्र | ०३ | - | - | - | - | १ | - | - | - | - | - | २ |
| १६ | न्यायवैद्यकशास्त्र | ०४ | १ | - | १ | - | १ | १ | - | - | - | - | - |
| १७ | विकृतीशास्त्र | ०२ | - | १ | - | - | १ | - | - | - | - | - | - |
| १८ | साथरोग व तज्ञ-नि-अधिव्याख्याता (PSM) | ०१ | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १९ | स्त्री वै.अधिकारी नि नि-अधिव्याख्याता (PSM) | ०१ | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २० | वैद्यकीय अधिकारी (PSM) | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | - |
| | एकूण | ३५ | १२ | ०३ | ०३ | ०० | ०८ | ०१ | ०० | ०० | ०० | ०२ | ०६ |

Achulay

**अधिष्ठाता,**

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,

नागपुर.

**विषय** -: स्थानिक निवड समितीमार्फत (डि.एस.बी.) तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरीता सहायक प्राध्यापक गट- ब चीपदे भरण्याबाबत.

**संदर्भ** -: शासन निर्णय क्र.एलईसी-१४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३ दिनांक १८.०७.२०२४

रिक्त जांगाच्या संख्येत बदल होण्याची शक्यता असल्यामुळे सदरील रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. तसेच या जाहिरातीमधील कोणताही मजकूर उदा. अटी, शर्ती, नियम, पदसंख्या इत्यादी मध्ये कोणतेही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांना राखून ठेवले आहे.

सर्व जाहिरात केलेल्या रिक्त पदासाठी मुलाखती घेण्यात येत असुन,रिक्त पदाच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड केलेल्या उमेदवारांना नियुक्तीचे आदेश ३६४ दिवसाकरीता देण्यात येतील व तदनंतर रिक्तपदे उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे विचार करण्यात येईल. उमेदवाराची कागदपत्रे परिपुर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. जर उमदेवारास एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज सादर करावयाचा असेल तर प्रत्येक पदासाठी वेगळा अर्ज सादर करावा.

## नियम व अटी -:

०१) वेतनश्रेणी -: सहायक प्राध्यापक यांना दिनांक ३१.१२.२०२० च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये फक्त) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहिल.तसेच विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी यांना दरमहा रु. ८५,०००/- ठोक मानधन अनुज्ञेय राहिल.सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मुळ अनुदानातून १० कंत्राटी सेवा या उदिष्टामधून भागविण्यात येईल.

०२) वयोमर्यादा -: सेवाप्रवेश नियमानुसार वयोमर्यादा खुल्या प्रवर्गाकरीता ३८ वर्ष व मागास प्रवर्गाकरिता ४३ वर्ष राहिल. उमेदवार मागास प्रवर्गात असेल तर जात व जातवैधता प्रमाणपत्र आश्यक राहिल.

०३) गुणवत्ता -: राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या मानकाची पुर्तता करण्याकरीता वरील पदाकरीता वरीष्ठ निवासी पदाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक राहिल.

०४) एमडी/एमएस किंवा एमबीबीएस अभ्यासक्रम या संस्थेतून पास केलेल्या अदेवारांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवार जर या संस्थेतून पास झाला नसल्यास महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झाला असल्यास त्यास प्राध्यान्य देण्यात येईल. महाराष्ट्रातील इतर शासकीय संस्थेतून पास झालेला उमेदवार उपलब्ध नसल्यास खाजगी संस्थेतून किंवा इतर राज्यातून आलेला विद्यार्थ्यांना विभागाची निकड लक्षात घेता प्राध्यान्य देण्यात येईल.

०५) सहायक प्राध्यापक पदाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

०६) मेरिट गुण पीजी आणि युजी नुसार प्राध्यान्य देण्यात येईल तसेच शोधनिबंध,राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

०७) सदर तात्पुरती नियुक्ती हि महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा इतर संस्थेतुन बदलीने उमेदवार रुजु होईपर्यंत किंवा संचालनालया मार्फत बंधपत्रित उमेदवार म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीने रुजु होईपर्यंत किंवा शासन स्तरावरील निवड मंडळा मार्फत नियुक्तीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा विभागातील पदे कमी झाल्यास जे आधी घडेल तोपर्यंत राहिल.

०८) निवड करण्यात आलेला उमेदवार कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी गैरहजर असल्यास किंवा काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

०९) मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता कोणताही प्रकारचा प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही,तसेच मुलाखतीस उपस्थित राहण्याकरीता या कार्यालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियतून बाद करण्यात येईल.

११) सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

१२) संस्थेत तात्पुरत्या सेवेत कार्यरज असलेल्या उमेदवारांनी अर्ज विभागप्रमुखा मार्फत सादर करण्यात यावे.

१३) उमेदवार या महाविद्यालया व्यतिरीक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय वैद्यक परिषदेच्या निरीक्षणात सहभाग नोंदविला असल्यास तसे अर्जात नमूद करण्यात यावे.

१४) सदर पदाकरीता उमेदावांची नियुक्ती निव्वळ ३६४ दिवसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर राहिल.३६४ दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देवून पुन्हा ३६४ दिवसासाठी पुनर्नियुक्तीबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना सादर करण्यात येईल.

१५) अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या छायाप्रति साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारले जाणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे** -: अ) प्रथम,व्दितीय व तृतीय वर्ष एमबीबीएस तसेच एमडी/एमएस किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे (ब) सर्व पदवी पदवीका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतीम वर्षाची गुणपत्रिका (क) एम.एस.सी. तसेच एम.सी.आय. नुतणीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्र (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात व जात वैघता प्रमाणपत्र ( लागू असल्यास) (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडलाचा दाखला (फ) एक वर्ष वरीष्ठ निवासी पदाचे अनुभव प्रमाणपत्र (ग) पॅनकार्ड व आधार कार्डची छायाप्रत इ. कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**-: सदर जाहिरात या महाविद्यालयाच्या iggmc.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**अधिष्ठाता,**
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपुर.

प्रति -:

1) **मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई** माहितीकरीता सविनय सादर.
2) सबंधित प्राध्यापक व विभाग प्रमुख,इंगांशावैम,नागपूर.
3) सर्व अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालये यांना माहितीकरीता सविनय सादर.
4) नोटीस बोर्ड करीता, इंगांशावैम,नागपूर.